IIJS Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# पर्यावरण शिक्षण

**Mrs. Pandit Minakshi Shivprasad,**
**Adarsh Adhyapan Vidyalaya,**
**Nashik**

निसर्गाच्या सानिध्यात बालकाचा विकास हा स्वास्थपूर्ण व निरोगी होत असतो. विद्यार्थ्यांना बालवयापासूनच पर्यावरणाविषयी जिज्ञासा व कुतूहल असते पर्यावरणाच्या संरक्षण व संवर्धनामध्ये विद्यार्थ्यांचा अधिकाअधिक सहभाग घेण्याच्या दृष्टीने आज पर्यावरण शिक्षणाची भूमिका महत्वपूर्ण ठरते.

**पर्यावरण शिक्षण:-** पर्यावरण शिक्षणाचा अर्थ व स्वरूप बघायचा झाल्यास पर्यावरणाशी संबधित असलेले शिक्षण म्हणजे 'पर्यावरण शिक्षण.' आपल्या सभोवतालच्या सर्व घटकांना ते स्पर्श करते. त्या अर्थाने ते सर्वसमावेशक आहे. पर्यावरण शिक्षणाचे चार प्रमुख घटक असे 1) पर्यावरण विषयक जाणीव जागृती 2) प्रत्यक्ष जीवनातील प्रसंग 3) पर्यावरणाचे संरक्षण 4) चिरस्थायी विकास

पर्यावरण शिक्षणाच्या प्रक्रीयेद्वारे, सद्यस्थितीचा अभ्यास करून पर्यावरणीय समस्यांचे आकलन होण्यासाठी पूरेसे ज्ञान प्राप्त होईल व त्या सोडविण्यास मदत करता येईल.

**पर्यावरणाचे घटक:-** स्थूल मानाने पर्यावरणाची विभागणी चार प्रमुख घटकात केली आहे 1) जमीन 2) पाणी 3) हवा 4) सजीव प्राणी - यामध्ये खालील घटकांचा समावेश होतो.

(1) परिसर (2) परिसंस्था (3) मनुष्य जीवन (4) वन्यजीवन (5) लोकसंख्या विस्फोट (6) औद्योगीकरण (7) प्रदुषण (8) स्वास्थ (9) मानसिक आरोग्य (10) शहरीकरण (11) भौगोलिक स्थिती (12) हवामान (13) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सबंध (14) नैतिक, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक परिवेश.

**पर्यावरण शिक्षणाची गरज:-** सध्याच्या ढासळलेल्या पर्यावरणाच्या अवस्थेत साध्या ज्या वेगाने व पध्दतीने पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे, लोकसंख्येची अनियंत्रित वाढ झाल्याने नैसर्गिक स्त्रोतांच्या ऱ्हासाचे व प्रदुषणाचे संकट उभे टाकले आहे हे पाहता विद्यार्थ्यांना या विषयाचे गांभीर्य व तीव्रता लहान वयातच कळली तरच पुढे काहीतरी विधायक घडण्याची शक्यता आहे. याच उद्देशाने सर्वोच्य न्यायालयाच्या निर्णयानुसार हा स्वतंत्र व अनिवार्य विषय म्हणून जाहिर करण्यात आला आहे.

## पर्यावरण शिक्षणाची उद्दिष्टे:-

1) पर्यावरणाच्या घटकांची ओळख करून देणे.
2) विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षण, व्यवस्थापन, संवर्धन या प्रक्रियेत सक्रिय भाग घेण्यास प्रवृत्त करणे.
3) पर्यावरण समस्या सोडविणे किंवा त्यांची तीव्रता कमी करण्यासाठी सजीव सृष्टीचा एक जबाबदार घटक म्हणून पर्यावरण संवर्धनाची शिक्षक-प्रशिक्षकांना संधी उपलब्ध करून देणे.
4) सामाजिक गट, संस्था, नागरिक, विद्यार्थी, छात्रअध्यापक यांच्यामध्ये पर्यावरण घटक, त्या विषयीच्या समस्यांची जाणीव निर्माण करणे.
5) मानवाच्या हस्तक्षेपामुळे पर्यावरणातील विविध घटकांत निर्माण झालेल्या असंतुलनाची जाणीव निर्माण करून देणे.
6) पर्यावरणीय प्रदुषणे:- 1) अंतराळ प्रदूषण 2) जल प्रदुषण 3) वायू प्रदुषण 4) ध्वनी प्रदुषण 5) रेडिओ धर्मीय प्रदुषण 6)भूमी प्रदुषण 7) परिसंस्था असंतुलन 8) नैसर्गिक साधनसंपत्तीचे शोषण 9) मृदा अपरदन 10) उर्जा प्रदुषण 11) किटकनाशके, तणनाशके संग्रहण या विषयीच्या दुष्परीणामांची जाणीव करून देणे.
7) पर्यावरणाविषयक सकारात्मक मूल्ये निर्माण करणे.
8) पर्यावरणाच्या संवर्धनामध्ये आणि पर्यावरण विषयक चळवळींमध्ये सक्रीय सहभाग घेणे.

## भारताचे पर्यावरण विषयक धोरण:-

‘निसर्गाशी सुसंगत विकास’ ही भारताची भूमिका आहे. डॉ. एम.एस. स्वामीनायन यांच्या अध्यक्षतेखाली एप्रिल 1990 मध्ये समिती नेमली होती त्या आधारे सर्व पर्यावरण विषयी समस्यांचा अभ्यास करून पर्यावरण विषयी धोरण 1992 मध्ये जाहीर केले. भारतामध्ये 1980 मध्ये प्रथम केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाची स्थापना झाली. वरील धोरणाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

1) पर्यावरणावर ताण पडणार नाही अशा प्रकारे नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करावा जेणेकरून भविष्यात याबाबत अडचणी निर्माण होणार नाही.
2) जमीन, हवा, जलस्त्रोतांचे संरक्षण
3) पर्यावरण संरक्षणाच्यादृष्टीने संवेदनशील भागासाठी विशेषकृती योजना निर्माण करणे.
4) नैसर्गिक व मनुष्यनिर्मीत वारसांचा या पुढे ऱ्हास होवू नये म्हणून करावयाच्या उपाययोजना.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

5) विकासामुळे पर्यावरणाची कमीत कमी हानी होईल अशा प्रकारे करावयाच्या उपाययोजना.
6) समुद्र किनारपट्टी, समुद्र किनारपट्टीवरील जैविक साधनसंपत्ती व संवेदनक्षम भागाचे संरक्षण.
7) जैविक साधन संपत्ती, जैविक विविधता, नैसर्गिक साधनसंपत्तीतील गुणसूत्रता यांचे जतन तसेच पर्वतीय भाग, वाळवंट, दलदलीच्या जागा, नद्या, बेटे इत्यादीचे संवर्धन व संरक्षण व उपाययोजना.

नैसर्गिक आपत्तीमूळे सुध्दा पर्यावरणाचे प्रश्न निर्माण होतात. पर्यावरणाचे प्रश्न सोडविण्यासाठी अद्यायावत ज्ञानाची व साधनांची अत्यंत आवश्यकता आहे. प्रदुषणाचा व्यक्तिगत आणि सामुहिक जीवनावर होणारा दुष्परीणाम विद्यार्थ्यांना वेळोवेळी जाणीवपूर्वक सांगितला पाहिजे.

## पर्यावरण शिक्षणात शिक्षकाची भूमिका :-

शिक्षक हा शिक्षक न राहता तो समाजाचा एक आधारस्तंभ बनला पाहिजे. समाजातील सर्व बदल शिक्षकांवर परिणाम करतात. आणि समाजामध्ये बदल घडविण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्ये असते. असे शिक्षक तयार करण्याचे काम आध्यापकाचार्य करत असतात. एका अर्थाने समाजाला दिशा देण्याचे काम आपण करीत असतो. पर्यावरणाचा ऱ्हास या मोठ्या समस्येने समाजाचे अस्तित्व पणाला लागले आहे. यादृष्टीने पर्यावरण शिक्षणात शिक्षकाची भूमिका महत्वाची ठरते.

प्रत्येक शिक्षकामध्ये पर्यावरण हा विषय शिकविण्याच्या दृष्टीने काही गुण असणे आवश्यक आहेत ते असे.

1. शिक्षकाला स्वत:ला पर्यावरणाचे मूलभूत ज्ञान हवे. (तत्वे, संकल्पना)
2. शिक्षक स्वत: साधनसमृध्द (resourceful) उपक्रमशील, ध्येयप्रेरीत व उत्साही असावा.
3. त्याला पर्यावरणीय समस्यांची जाणीव असावी.
4. पर्यावरण विषयक त्याला आस्था व रूची असावी.

पर्यावरण शिक्षण दोन पध्दतीने शिकविला जातो. 1) शालेय विषयांमधून, उपक्रमांमधून 2) स्वतंत्र विषय म्हणून शिक्षक पर्यावरणाविषयी किती जागृत आहे ह्यावर पर्यावरण शिक्षणाचे यश अवलंबून आहे.

पर्यावरण शिक्षकाने या विषयाच्या दर्जेदार अध्यापनासाठी पुढील गोष्टी करणे आवश्यक आहे.

1) अध्यापनाचे नियोजन:- विविध अध्यापन पध्दती व साधने यांचे नियोजन.
2) विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे:- विद्यार्थ्यांना पर्यावरणप्रती काही कृती करण्याची प्रेरणा देणे उपक्रमाबद्दल शाबासकी देणे.
3) कार्यक्रमांचे दिग्दर्शन:- कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी तसेच पर्यावरणाच्या सुधारणेसाठी विद्यार्थ्यांना

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

दिग्दर्शन करणे.

4) कार्यक्रमांचे नेत्वृत्व:- विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमासाठी नेत्वृत्व करणे.
5) कार्यक्रमांचे सूत्रसंचालन:- विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कार्यक्रमांचे सूत्रबध्दरित्या संचालन करणे.
6) कार्यक्रमांचे नियंत्रण:- विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमांचे नियंत्रण करणे.

## पर्यावरण शिक्षणाचे उपक्रम:-

1) पर्यावरण विषयक कात्रणे जमविणे.
2) शिक्षकाने आपल्या सभोवतालचे परिसराचे डोळसपणाने निरीक्षण करणे ही निरीक्षण क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न करणे.
3) वर्गखोलीत पर्यावरण जाणीव जागृती कोपरा तयार करावा. या जागेत भित्तीचित्रे, औषधी वनस्पती, बियाणे, पाने, पर्यावरणावर आधारित खेळ, कोडी, वाक्यपट्या यांचा सग्रह असावा.
4) पर्यावरणासंदर्भात उपलब्ध असणाऱ्या ऐतिहासिक उताऱ्यांचा संग्रह करावा. ओव्या, गीते, वेचे शोधून काढावेत.
5) विविध स्तरांवर होणाऱ्या पर्यावरणविषयक गटचर्चा, व्याख्याने, कृतिसत्रे यात जाणीवपूर्वक सहभाग घ्यावा.
6) निसर्गातील काही वैशिष्ट्यपूर्ण वस्तूंचा संग्रह करून त्यांचे प्रदर्शन भरवावे.
7) स्थानिक पर्यावरण तज्ञांची यादी करून त्यांची व्याख्याने आयोजित करावीत.
8) विद्यार्थ्यांना वृक्षरोपण करण्याचे आवाहन करावे स्वत: झाड दत्तक घ्यावे.
9) वार्ताफलक-काचफलक, भित्तीपत्रके यातून वनस्पतींविषयी माहिती द्यावी.
10) आकाश दर्शन, पक्षी-निरीक्षण इ. कार्यक्रम आयोजित करावेत.
11) क्षेत्रभेटी-निसर्गसहली आयोजित कराव्यात.
12) मॉडेल्स तयार करावीत.
13) नाट्यीकरण-संवाद, पथनाट्य याद्वारा शिक्षण द्यावे.
14) प्रश्नमंजुषा, निबंध, वक्तृत्व, चित्र, घोषवाक्य, रांगोळी स्पर्धा आयोजित कराव्यात.
15) मुलांकडून शोभिवंत फुलझाडांच्या कुंड्या तयार करून घ्याव्यात रिकाम्या जागी रोपवाटीका तयार करावी.
16) पर्यावरणासंबधीचे लेख, बातमी यांचे वाचन करून घ्यावे.
17) रोजच्या परिपाठात निसर्गाचे महत्व सांगणारी वचने, अभंग, ओव्या यांचाही समावेश करावा.

18) वर्षभरात येणाऱ्या सणांचे पर्यावरणाविषयक महत्व सांगणारी नोंदवही विद्यार्थ्यांकडून तयार करून घ्यावी.

19) वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन-शिबीरांचे आयोजन करावे.

20) पावसाळ्याच्या आरंभी गावाजवळील टेकड्या, डोंगरावर विविध बिया उधळाव्यात.

**संदर्भ:-**


1) शिक्षणातील बदलते विचारप्रवाह :- डॉ. सौ. रमा भोसले
डॉ. श्रीमती उज्वला डोळे

2) शिक्षणातील नवे विचार प्रवाह :- य. च. म. मु. विद्यापीठ सेवांतर्गत अध्यापक प्रशिक्षण पुस्तिका-1996

3) अध्यापक विद्यालयातील प्राचार्य/ अध्यापकाचार्य यांच्यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षण मार्गदर्शक :- राज्य शिक्षक प्रशिक्षण मंडळ, म. रा. शै. सं. प्र. पुणे-2011